ePaper

## मोदींचा एकेरी उल्लेख, खोटारडा म्हणत प्रकाश आंबेडकरांची सडकून टीका



| वर्ष - 7 | अंक - 290 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 7 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- शबनीम इस्माईलने रचला इतिहास
- जान्हवी कपूर तिरुपतीच्या दर्शनाला
- भारतीय तरूण रशियात अडकले
- भंडारा लोकसभा: उमेदवार निश्चित!


## पिंपरी ते निगडी मेट्रोचे उद्घाटनही मोदीच करतील

# पंतप्रधान मोदीजी की गॅरंटी!

## » शंकर जगताप : पुणे-निगडी मेट्रोचे पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन

। पिंपरी । महाईन्यूज

**गेल्या दहा वर्षांपासून पिंपरी-चिंचवडकरांची मागणी असलेल्या पिंपरी ते निगडी या मार्गावरील मेट्रोच्या कामाचे भूमीपूजन देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते आज झाले. आगामी लोकसभेच्या निवडणुकीत देशातील जनता मोदीजींवर विश्वास दाखवून ४०० जागांचा आकडा भाजपा पार करेल, पुन्हा तिस-यांदा मोदीजी पंतप्रधान पदी विराजमान होवून, या पिंपरी ते निगडी मेट्रोचे उदघाटन करतील, असा विश्वास भाजपा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पिंपरी ते निगडी या मेट्रो मार्गाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. कोलकाता येथून पंतप्रधान मोदी यांनी ऑनलाइन माध्यमातून हे भूमिपूजन केले. पीसीएमसी मेट्रोस्थानकावर हा भूमिपूजन समारंभ बुधवारी (दि. 6) संपन्न झाला.

पिंपरी ते निगडी मेट्रो कामाच्या भूमीपूजन कार्यक्रमाला पिंपरी स्थानकात लाईव्ह प्रक्षेपणावेळी खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, आमदार अश्विनी जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार अण्णा बनसोडे, विधान परिषदेच्या आमदार उमाताई खापरे, मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, माजी महापौर योगेश बहल, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी स्थायी समिती सभापती विलास मडेगिरी, भाजपा प्रवक्ता तथा वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी, उपाध्यक्ष रवी देशपांडे, आशा काळे, चिटणीस सचिन काळभोर, विजय शिनकर आदी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते महाराष्ट्र उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि केरळ या राज्यातील सहा मेट्रो मार्गाचे उद्घाटन करण्यात आले. त्यासह पिंपरी येथे पिंपरी ते निगडी मेट्रो मार्गाचे भूमिपूजन झाले. एस्प्लानेड मेट्रो स्टेशन कोलकाता येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 15 हजार 400 कोटी रुपयांच्या मेट्रो प्रकल्पाचे ऑनलाईन माध्यमातून उद्घाटन करण्यात आले. आरआरटीएस मुरादनगर उत्तर प्रदेश, मजेरहाट मेट्रो पश्चिम बंगाल, पुणे मेट्रो रुबी हॉल क्लिनिक महाराष्ट्र, पुणे मेट्रो रामवाडी महाराष्ट्र, पुणे मेट्रो पीसीएमसी मेट्रो स्टेशन महाराष्ट्र, आगरा मेट्रो उत्तर प्रदेश, कवी सुभाष मेट्रो पश्चिम बंगाल येथे उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.



### लोकसभा निवडणुकीत भाजपाचे 400 पार...

**» पुण्यातील सर्वात पहिली मेट्रो पिंपरी ते शिवाजीनगर या मार्गावर धावली. या मार्गाचे भूमीपूजन कणखर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते झाले होते. त्यांच्याच हस्ते या मेट्रो मार्गाचे उद्घाटनही झाले. आज या मार्गावर मेट्रो धावत आहे. पुणे व पिंपरी-चिंचवडमधील वाहतुकीचा ताण कमी होण्यास या मेट्रो मार्गामुळे मदत झाली आहे.**

**आता पिंपरी ते निगडी मेट्रो मार्गाचे भूमीपूजन पंतप्रधान मोदीजी यांच्या हस्ते झाले आहे. लवकरच होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे ४०० हून अधिक खासदार निवडून येतील आणि नरेंद्रजी मोदी हे बहुमताने आपल्या देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील. त्यानंतर पिंपरी ते निगडी मेट्रो मार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून त्याचे उद्घाटन सुद्धा पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्याच हस्ते होईल, असेही जगताप म्हणाले.**

“ महामेट्रोकडून पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रोच्या दोन मार्गिकांवर काम सुरु आहे. त्यातील काही भाग दोन टप्प्यांत प्रवासी वाहतुकीसाठी सुरु करण्यात आला आहे. या मेट्रोच्या कामाचे भूमिपूजन आणि दोन्ही टप्प्यातील उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. आता पिंपरी ते निगडी या विस्तारित मेट्रो मार्गाच्या कामाचे देखील उद्घाटन मोदी यांच्या हस्ते झाले आहे. तिसऱ्यांदा मोदी पंतप्रधान होतील आणि या मार्गाचे उद्घाटनही मोदीच करतील.

-शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड

## चिखली, कुदळवाडीत अनधिकृत बांधकामांवर ‘हातोडा’

## » महापालिकेची कारवाई सुरूच : सुमारे 6 लाख चौरस फूट क्षेत्र चकाचक

। पिंपरी। महाईन्यूज ।

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विशेष मोहिमे अंतर्गत, प्रभाग क्र.०२ मधील कुदळवाडी, चिखली ३० मीटर डी.पी. रस्त्यामधील आज अखेर सुमारे ६,००,००० चौ. फुट क्षेत्रातील आर.सी.सी. बांधकामे, वीट बांधकामसह व पत्राशेड इत्यादीवर अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली व रस्ता रुंदीकरण करण्यात आले. ०१ आर.सी.सी. बांधकामे, ०३ वीट बांधकामासह पत्राशेड व ०१ सिमाभिंत इत्यादीवर अतिक्रमण निष्कासनाची आज कारवाई करण्यात आली व रस्ता रुंदीकरण करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे – पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, मनोज लोणकर उपआयुक्त यांचे निर्देशानुसार कारवाई करणेत आली.



क, ई, फ व ह क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, सिताराम बहुरे व उमेश ढाकणे तसेच कार्यकारी अभियंता राजेंद्र राणे, उपअभियंता सुर्यकांत मोहिते, मनोज बोरसे, नरेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली सदर कारवाई करण्यात आली.

### परवानगीशिवाय बांधकाम करु नका...

**» आज अखेर प्रभाग क्र.०२ चिखली / कुदळवाडी परिसरातील सुमारे ६,००,००० चौ. फुट वीट बांधकाम व पत्राशेडवर अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात आली. दि.०५/०३/२०२४ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत क क्षेत्रीय कार्यालयाकडील अतिक्रमण पथक, महाराष्ट्र सुरक्षा बल व महाराष्ट्र पोलीस पथक, सहभागी झाले होते.**

# उबर अन् कॅबचालकांच्या वादात पुणेकर वेठीस!

## वातानुकूलित टॅक्सीच्या दरात कंपनीने भाडेवाढ केलेली नाही

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वातानुकूलित टॅक्सीच्या दरात ओला आणि उबर कंपनीने भाडेवाढ केलेली नाही. यामुळे कॅबचालकांकडून बेमुदत बंद सुरू आहे. कंपन्या आणि कॅबचालकांच्या वादाचा फटका प्रामुख्याने प्रवाशांना बसला आहे. प्रवाशांना वेठीस धरले जात असताना प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि जिल्हा प्रशासनाने बघ्याची भूमिका घेतली आहे.**




वातानुकूलित टॅक्सीच्या दरात प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने जानेवारी महिन्यात वाढ केली होती. वातानुकूलित (एसी) टॅक्सीचे दर पहिल्या दीड किलोमीटरसाठी ३७ रुपये आणि पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी २५ रुपये करण्यास जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. हे नवीन दर जानेवारी महिन्यात लागू झाले असूनही ओला, उबरने याची अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे कॅबचालकांनी मंगळवारपासून (ता.५) बेमुदत बंद सुरू केला आहे.कॅबचालकांच्या संघटना आणि ओला, उबर कंपन्यांचे प्रतिनिधी यांची बैठक जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी नुकतीच घेतली होती. त्या बैठकीत कॅबचालकांच्या मागण्यांवर तोडगा न निघाल्याने त्यांनी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा फटका प्रवाशांना मोठ्या प्रमाणात बसत आहे. कंपन्या आणि कॅबचालकांच्या वादात प्रवासी वेठीस धरले जात आहेत. असे असतानाही प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून केवळ बघ्याची भूमिका घेतली जात आहे. कंपन्या तसेच, कॅबचालकांवर कोणतीही कारवाई झालेली नाही.

भारतीय गिग कामगार मंचाचे डॉ. केशव क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली कॅबचालकांचा बेमुदत बंद सुरू आहे. सलग दुसऱ्या दिवशी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचा दावा त्यांनी केला आहे. वातानुकूलित टॅक्सीच्या दरात प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने जानेवारी महिन्यात वाढ केली होती. वातानुकूलित (एसी) टॅक्सीचे दर पहिल्या दीड किलोमीटरसाठी ३७ रुपये आणि पुढील प्रत्येक किलोमीटरसाठी २५ रुपये करण्यास जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. हे नवीन दर जानेवारी महिन्यात लागू झाले असूनही ओला, उबरने याची अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे कॅबचालकांनी मंगळवारपासून (ता.५) बेमुदत बंद सुरू केला आहे.कॅबचालकांच्या संघटना आणि ओला, उबर कंपन्यांचे प्रतिनिधी यांची बैठक जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी नुकतीच घेतली होती. त्या बैठकीत कॅबचालकांच्या मागण्यांवर तोडगा न निघाल्याने त्यांनी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा फटका प्रवाशांना मोठ्या प्रमाणात बसत आहे. कंपन्या आणि कॅबचालकांच्या वादात प्रवासी वेठीस धरले जात आहेत. असे असतानाही प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून केवळ बघ्याची भूमिका घेतली जात आहे. कंपन्या तसेच, कॅबचालकांवर कोणतीही कारवाई झालेली नाही.

भारतीय गिग कामगार मंचाचे डॉ. केशव क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली कॅबचालकांचा बेमुदत बंद सुरू आहे. सलग दुसऱ्या दिवशी बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचा दावा त्यांनी केला आहे. याचवेळी कॅबचालकांच्या मागण्यांसाठी ऑटो, टॅक्सी, बस ट्रान्सपोर्ट फेडरेशनचे बाबा कांबळे यांना आंदोलन करण्यास प्रशासनाने परवानगी नाकारली आहे.

### प्रशासनाने परवानगी नाकारली

» ओला, उबर कंपन्यांसमोर आरटीओ आणि जिल्हा प्रशासन पायघड्या घालत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.ओला, उबरच्या भाडेवाढीस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) विरोध केला आहे. पक्षाचे सरचिटणीस हेमंत संभूस म्हणाले की, ओला, उबरची विनापरवाना सेवा सुरू आहे. सरकारने आधी त्यांना कायदेशीर कक्षेत आणावे. या कंपन्यांचे प्रश्न राज्य सरकारकडे प्रलंबित आहेत. आधी त्यावर निर्णय घेतला जावा. तसेच, कंपन्या आणि कॅबचालक संघटना यांच्या वादात पुणेकरांना वेठीस धरू नका.याचवेळी कॅबचालकांच्या मागण्यांसाठी ऑटो, टॅक्सी, बस ट्रान्सपोर्ट फेडरेशनचे बाबा कांबळे यांना आंदोलन करण्यास प्रशासनाने परवानगी नाकारली आहे.

---

# नव्या योजना की जुन्या प्रकल्पांना मुलामा?

## पुणे महापालिकेचे आज अंदाजपत्रक; दहा हजार कोटींच्या 'विक्रमा'ची शक्यता

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी आर्थिक वर्षासाठीचे (२०२४-२५) महापालिकेचे अंदाजपत्रक आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्याकडून गुरुवारी मांडण्यात येणार आहे. अंदाजपत्रक दहा हजार कोटींचा टप्पा ओलांडण्याची शक्यता असून समान पाणीपुरवठा योजना, नदीसुधार प्रकल्प, उड्डाणपूल यांच्यासह शहराला कोणती नवी योजना मिळणार.**

दरम्यान, उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी परिस्थिती असल्याने जुन्या योजनाच पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात येण्याची शक्यता असून नव्या योजना अपवादानेच मांडल्या जातील, अशी चर्चा आहे.सलग दुसऱ्या वर्षी अंदाजपत्रक उशिरा सादर होत आहे. मात्र महापालिकेत प्रशासकीय राजवट असल्याने स्थायी समितीला अंदाजपत्रक मांडल्यानंतर स्थायी समिती आणि मुख्य सभेच्या मान्यतेची केवळ औपचारिकता राहणार असून एक एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी सुरू होणार आहे.महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी चालू आर्थिक वर्षासाठीचे ९ हजार ५६६ कोटींचे अंदाजपत्रक गेल्या वर्षी मार्च महिन्यात मांडले होते. त्यामध्ये



जुन्या योजना पूर्ण करण्यास प्राधान्य दिले होते. यावेळीही जुन्या योजनाच मांडल्या जाण्याची दाट शक्यता अधिकारी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे. शहरात सध्या मेट्रो मार्गिकांची कामे, जायका प्रकल्प, मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजना, समान पाणीपुरवठा योजनेसह उड्डाणपुलांची कामे सुरू आहेत. या सर्व महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी हजारो कोटींचा खर्च होणार आहे. या योजनांची कामे सध्या सुरू आहेत. त्यामुळे या प्रकल्पांसाठी भरीव आर्थिक तरतूद केली जाईल.

वर्षात महापालिकेला मिळालेले उत्पन्न आणि खर्चाचा विचार करता अंदाजपत्रकात गृहीत धरलेले उत्पन्न प्राप्त करण्यासाठी महापालिकेला तारेवरची कसरत करावी लागली आहे. त्यामुळे आगामी अंदाजपत्रकामध्येही १ हजार ५०० ते १ हजार ७०० कोटींची अंदाजपत्रकीय तूट येण्याची शक्यता आहे.

या परिस्थितीत आयुक्तांना उत्पन्न आणि खर्चाचा मेळ साधण्याचे आव्हान आयुक्तांपुढे असणार आहे.आगामी आर्थिक वर्षात मिळकतकरामध्ये वाढ होणार नसल्याने उत्पन्नासाठी पारंपरिक आर्थिक स्रोतांवरच अवलंबून राहावे लागणार आहे.

### योजना अपवादानेच मांडल्या जातील

» मिळकतकर, बांधकाम विभागाबरोबरच शासकीय अनुदान, थकबाकी वसुली यावरच उत्पन्नाचा डोलारा उभा राहणार आहे. त्यामुळे या विभागांना उत्पन्न प्राप्तीचे किती उद्दिष्ट दिले जाते, याबाबतही उत्सुकता अधिकारी वर्गात आहे.आगामी आर्थिक वर्षासाठीचे (२०२४-२५) महापालिकेचे अंदाजपत्रक आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्याकडून गुरुवारी मांडण्यात येणार आहे. अंदाजपत्रक दहा हजार कोटींचा टप्पा ओलांडण्याची शक्यता असून समान पाणीपुरवठा योजना, नदीसुधार प्रकल्प, उड्डाणपूल यांच्यासह शहराला कोणती नवी योजना मिळणार. जुन्या योजनाच पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात येण्याची शक्यता असून नव्या योजना अपवादानेच मांडल्या जातील.

# शिवसेनेचा संजोग वाघेरे हा म्हणजे शिवरायांच्या विचारांचा मावळा!

## लोकसभा निवडणूक रणसंग्राम : जयंत पाटलांनी थोपाटली पाठ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभेचे उमेदवार संजोग वाघेरे यांना पहिल्यांदाच बोलताना पाहिले आहे. ते शिवछत्रपतींच्या विचारांचा मावळा असल्याचे वाटले असल्याचे गौरवोद्गार शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी खोपोली येथील सभेत वाघेरे यांच्याबद्दल काढले. पाटील पुढे म्हणाले की, आगामी काळात सर्व सुत्रे वाघेरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडे येतील. त्यामुळे 'शेकाप'ची ताकद वाघेरे यांच्या पाठीशी असल्याचे जयंत पाटील यांनी जाहीर स्पष्ट केले आहे. त्यामुळे वाघेरे यांचे मावळात राजकीय पारडे जड झाले आहे.**







लोकसभा निवडणुकीचे रणांगण तापले आहे. सर्वच पक्षांनी त्यासाठी कंबर कसली आहे. सध्या महायुती आणि महाविकास आघाडी जागा वाटपावर मॅरेथॉन बैठका घेत आहेत. काही अपवाद जागांचा तिढा सुटला असून उमेदवार देखील निश्चित झाले आहेत. यापैकीच एक मावळ लोकसभा मतदारसंघ आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाला ही जागा सोडण्यात येणार आहे.

उद्धव ठाकरे यांनी संजोग वाघेरे यांना उमेदवार म्हणूनही घोषित केले आहे. त्यानुसार वाघेरे यांनी प्रचाराचे रान उठविले आहे. नुकतीच खोपोली येथे ५ मार्च रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची जनसंवाद यात्रेनिमित्त सभा पार पडली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व महाविकास आघाडीचे स्थानिक नेते, महाविकास आघाडीचे घटक पक्ष या वेळी उपस्थित होते. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची असलेली गर्दी या मतदारसंघातील पुढची दिशा स्पष्ट करणारी असल्याची चर्चा या वेळी राजकीय जाणकार करत होते. तर या बैठकीत शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी वाघेरे यांच्या पाठीमागे बळ उभारणार असल्याचे सांगितले.

या सभेत जयंत पाटील म्हणाले की, राजकीय नीतिमत्तेचा अनेकांना विसर पडला आहे. या लोकांना संजोग वाघेरे आणि त्यांचे सहकारी नक्कीच धुळीस मिळवतील. त्यांच्या साथीला शेतकरी कामगार पक्ष असल्याचेही जयंत पाटील यांनी सांगितले. उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शेकाप एकत्र आल्यास मावळ मध्ये आघाडीचाच उमेदवार विजयी होतो असे प्रतिपादन जयंत पाटील यांनी केले. मावळ ठाकरे यांच्या शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. घाटाच्या खाली ठाकरे यांचे नेतृत्व मानणारे कडवट आणि निष्ठावान शिवसैनिक आहेत. त्यांची ताकद वाघेरे यांच्या पाठीशी उभी राहिलच. मात्र त्याच्या जोडीला शेकाप आल्याने वाघेरे यांचा विजयाचा मार्ग सुखकर झाल्याचे सध्या तरी राजकीय जाणकार सांगत आहेत.

### शेकापची हक्काची तीन लाख मते...

**» मावळ लोकसभा मतदारसंघात चिंचवड, पिंपरी, मावळ, कर्जत, पनवेल आणि उरण या सहा विधानसभा मतदार संघांचा समावेश होतो. या पैकी कर्जत, पनवेल आणि उरण या विधानसभा मतदारसंघामध्ये शेकापची मोठी ताकद आहे. सुमारे ३ लाखाहून अधिक हक्काचे मतदार शेकापकडे आहेत. सध्या शेकाप महाविकास आघाडीचा भाग आहे. त्यामुळे शेकापच्या या मतांचा फायदा संजोग वाघेरे यांना होणार आहे.**

---

# मावळात विकासकामांचा धडाका सुरूच!

## खासदार श्रीरंग बारणे : विविध 13 कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदारसंघातील मावळ तालुक्यात शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांचा विकास कामांचा धडाका सुरुच आहे. पवना मावळातील विविध गावांमध्ये 13 कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन खासदार बारणे यांनी केले. गावांमध्ये चांगले रस्ते झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत खासदार बारणे यांचे आभार मानले.**



यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शिवसेना उपजिल्हा प्रमुख शरद हूलावळे, उपजिल्हा प्रमुख दिलीप पांढरकर, शिवसेना मावळ तालुका प्रमुख राजू खंडभोर, शिवसेना उपतालुका प्रमुख राम सावंत, शिवसेना देहूगावचे शहर प्रमुख सुनील हगवणे, पिंपरी चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस, युवासेना जिल्हा प्रमुख राजेंद्र तरस, अंकुश देशमुख, मुन्नाभाऊ मोरे, सरपंच, उपसरपंच आणि ग्रामस्थ उपस्थित होते. उर्से, आढे, ओझर्डे, सडवली, बऊर, करंज बेडसे, कडधे, येळसे, पवनानगर – काले, मळवंडी प. मा, थुगांव आणि शिवणे येथील तब्बल 13 कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन केले. या भूमिपूजनाच्या निमित्ताने खासदार बारणे स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.

मावळ तालुक्यातील प्रत्येक गावाला खासदार निधी दिल्याबद्दल ग्रामस्थांनी खासदार बारणे यांचे आभार मानले. खासदार बारणे यांचा मावळात दांडगा जनसंपर्क आहे. प्रत्येक गावातील नागरिकांशी त्यांचा थेट संपर्क आहे. त्यामुळे त्यांच्याबाबत संपूर्ण मतदारसंघात चांगले जनमत आहे.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, विकासाच्या दृष्टीकोणातून सर्वाधिक निधी मावळला दिला आहे. मावळात गावे विस्तारली आहेत. प्रत्येक गावात जाण्यासाठी तसेच अंतर्गत रस्ते करण्यावर भर दिला. माझे कर्तव्य मी पार पाडले आहे. राज्यात चांगल्या विचारांचे महायुतीचे सरकार आले आहे. त्यामुळे निधीची कमतरता भासत नाही. भरघोस निधी मिळत आहे. केंद्र सरकार, राज्य सरकारच्या निधीतून मावळात मोठी विकास कामे केली. जलजीवन योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे केली. सामाजिक न्याय, नगरविकास, जिल्हा नियोजन समितीकडून निधी मिळाला. एमएमआरडी, पीएमआरडीएच्या माध्यमातूनही अनेक कामे मार्गी लावली आहेत.

> **केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाअंतर्गत तळेगाव-चाकण शिक्रापूर रस्त्याचे काम लवकरच सुरु होईल. या सरकारच्या माध्यमातून त्यासाठी निधी उपलब्ध केला आहे. कार्ला एकविरा देवी विकास आराखड्याला मान्यता मिळाली आहे. पर्यटनासाठी निधी जाहीर केला आहे. लोणावळा, खंडाळ्यातील पर्यटनाला चालना दिली जाणार आहे. विकासासाठी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री भरघोस निधी देत आहेत. केंद्रात, राज्यात एका विचाराचे सरकार असल्यामुळे त्याचा फायदा मावळ तालुक्याच्या विकासासाठी होत आहे.**
> **-श्रीरंग बारणे, खासदार, शिवसेना, मावळ.**



## भूमिका

**नवे फौजदारी कायदे पोलिसांना अधिकाधिक अधिकार देऊन मानवाधिकार अधिक धोक्यात आणणारे आहेत. ब्रिटिशकाळात तयार करण्यात आलेल्या कायद्यांपेक्षाही जाचक कायदे करण्यात आले असतील, तर त्यांना सुधारणा म्हणता येईल का? सरकारला यातून केवळ स्वत:ची सत्ता आणि हुकूमशाही मजबूत करायची आहे का?**

# पोलीस यंत्रणेच्या हातात अमर्याद अधिकार?



गृहमंत्री अमित शहा यांनी ११ ऑगस्ट २०२३ रोजी संसदेत मांडलेली ‘भारतीय न्याय संहिता (बीएनएस)’, ‘भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस)’ आणि ‘भारतीय साक्ष्य विधेयक (बीएसएस)’ ही तीन विधेयके २० आणि २१ डिसेंबर २०२३ रोजी दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर झाली. आता हे नवीन फौजदारी कायदे अस्तित्वात आलेले आहेत.

या सरकारने फौजदारी कायदे बदलण्याबाबत एवढी गुप्तता का बाळगली आहे? न्यायदान, शिक्षण, वकिली क्षेत्रातील तज्ज्ञांशी सरकारने पूर्वसल्लामसलत का केली नाही? नवीन कायद्यांच्या तरतुदी पाहता न्यायव्यवस्थेचे पोलिसीकरण करण्याचा हा प्रयत्न आहे असेच म्हणावे लागेल. दंड संहिता आणि दंड प्रक्रिया संहितेमध्ये आरोपीच्या अटकेनंतर केवळ १५ दिवसांच्या पोलीस कोठडीची तरतूद आहे. थोडक्यात पोलिसी यंत्रणांकडे आरोपीचा ताबा जास्तीतजास्त १५ दिवस असू शकतो ( CRPC SEC. 167.2. A). त्यानंतर चौकशीसाठी पोलिसांना न्यायालयाच्या परवानगीने आणि तुरुंग प्रशासनाच्या उपस्थितीमध्ये तपास करावा लागतो. हे सगळे बदलून मोदी सरकारच्या नवीन कायद्यात आरोपीची पोलीस कोठडी ६० ते ९० दिवसांपर्यंत वाढवण्याची तरतूद आहे( BNS SEC.187). यातून पोलीस यंत्रणांची दंडेली, भ्रष्टाचार आणि दडपशाही वाढेल यात शंकाच नाही. पोलीस यंत्रणांना अमर्याद सत्ता देणे हे सत्तेचे विकेंद्रीकरण या संविधानाच्या मूलभूत तत्त्वाच्या विरुद्ध आहे. भारतीय दंड संहिता १८६०, फौजदारी कायदा संहिता १९७३ आणि भारतीय पुरावा कायदा १८७२ हे तीन ब्रिटिशकालीन कायदे बदलून हे फौजदारी कायदे आता अस्तित्त्वात आले आहेत. त्यापैकी नवीन भारतीय न्याय संहितेमध्ये जागोजागी पोलिसी व्यवस्था सर्वंकष करण्यासाठी तरतुदी आढळतात. उदा. दहशतवादी कृत्य कोणते याची व्याख्या सध्याच्या बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंध कायदा १९६५ (यूएपीए) यामधून उचलण्यात आलेली आहे. या तरतुदी मोदी सरकारने २०१९ मध्ये केल्या असून त्यानुसार एखादी व्यक्ती किंवा कृत्य हे दहशतवादी आहे अथवा नाही हे ठरवण्याचा अधिकारच पोलीस यंत्रणांकडे देण्यात आला आहे. अशा व्यक्तीची संपूर्ण मालमत्ता जप्त करून अमर्याद काळापर्यंत पोलीस आणि न्यायिक कोठडीची तरतूद पोलिसांच्या हातात देण्यात येणार आहे. कोणते कृत्य दहशतवादी हे ठरवण्याचे अधिकार पोलिसांना मिळणार आहेत. सरकार याचा गैरवापर करून विरोधक, सामाजिक कार्यकर्ते, माध्यमकर्मी यांना दहशतवादी ठरवू शकते, खटला न चालवता अमर्याद काळ तुरुंगात ठेवू शकते, त्यांच्या मालमत्ता जप्त करू शकते किंवा धमकी देऊन सरकारला सोयिस्कर भूमिका घ्यायला भाग पडू शकते.

ब्रिटिशकालीन राजद्रोहाचे कलम रद्द केल्याचे ढोल मोदी सरकार वाजवत असले तरी तशाच तरतुदी असलेले नवे कलम देशद्रोहाच्या नावाखाली समाविष्ट करण्यात आले असून आधीची ३ वर्षांची शिक्षा वाढवून ७ वर्षे करण्यात आली आहे. सध्याच्या कायद्यात प्रस्तावित शिक्षेचा निम्मा कालावधी कोठडीत काढल्यावर आरोपीला जामीन मागण्याचा हक्क आहे.

नवीन कायद्यात एकापेक्षा जास्त कलमे लावली असतील तर असा जमीन मिळू शकणार नाही. आरोपीला शिक्षेबाबत सौदा (प्ली बार्गेनिंग) आरोपपत्र दाखल झाल्यावर ३० दिवसांतच करता येईल, पूर्वी यावर कालमर्यादा नव्हती. नवीन कायद्यांमधील प्रत्येक तरतूद ही अटक, कोठडी आणि पोलिसी दंडेलशाही यासाठीच आहे, असे दिसते आहे. नवीन संहितेनुसार आरोपीला त्याच्याकडील इलेक्ट्रॉनिक उपकरणे पोलिसांना सुपूर्द करावीच लागतील. तसेच बोटांचे ठसे आणि आवाजाचे, हस्ताक्षराचे नमुने द्यावे लागतील. सध्याच्या कायद्यात न्यायालयांना असलेला हा अधिकार आता पोलिसांना देण्यात येत आहे.

## संपादकीय »

### न्यायदेवता बाटली!

***‘निवृत्तीनंतरच्या नेमणुकांचा मोह हा न्यायाधीशांच्या सेवाकाळातील निर्णयांस प्रभावित करतो.***

‘निवृत्तीनंतरच्या नेमणुकांचा मोह हा न्यायाधीशांच्या सेवाकाळातील निर्णयांस प्रभावित करतो. यामुळे न्यायपालिकेच्या स्वायत्ततेवर वाईट परिणाम होत असून हा लोकशाहीसमोरचा अत्यंत गंभीर धोका आहे.” हे विधान कोणा पत्रपंडिताचे नाही की स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्त्याचे नाही. हे करणाऱ्या व्यक्तीचे नाव अरुण जेटली. संसदेत ५ सप्टेंबर २०१३ या दिवशी बोलताना त्यांनी न्यायाधीशांचा निवृत्त्योत्तर पदांचा मोह लोकशाहीस किती मारक आहे याबाबत भाष्य केले. तथापि या भाषणाच्या पहिल्याच वर्धापनदिनी, म्हणजे ५ सप्टेंबर २०१४ या दिवशी, सरकारने त्यावेळी नुकतेच पायउतार झालेले सरन्यायाधीश पी. सदासिवम यांस केरळच्या राज्यपालपदाची बक्षिसी दिली. जेटली नव्या सरकारात मंत्री होते. पण सदासिवम यांच्या निवृत्त्योत्तर नेमणुकीबाबत त्यांनी काही विरोध केल्याची नोंद नाही. विरोधी पक्षांत असताना जे शहाणपण सुचते, सांगितले जाते.

डहाणूपासून वेंगुर्ल्यापर्यंत पसरलेल्या ७२० किलोमीटर लांबीच्या विस्तीर्ण कोकण किनारपट्टीच्या विकासाचे नियोजन करण्यासाठी राज्य शासनाने ‘सिडको’ प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. सृष्टिसौंदर्याने नटलेल्या कोकणातील किनारपट्टीचा एकात्मिक विकास करून तिला जागतिक दर्जाचे क्षेत्र म्हणून विकसित करण्याचा शासनाचा मानस आहे.

# कोकणाच्या नशिबी सिडकोचे न-नियोजन!



कोकणातील पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील नगरपालिका क्षेत्र वगळता अन्य परिसराच्या विकासासाठी कोणतेही विशेष नियोजन प्राधिकरण अस्तित्वात नसल्याने ‘सिडको’ची नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचा शासनाचा युक्तिवाद आहे. समुद्रसपाटीपासून डोंगररांगेच्या उच्चतम माथ्यापर्यंतच्या क्षेत्राचा विकास या प्राधिकरणाकडून करण्यात येईल. त्यासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून ‘सिडको’ची नियुक्ती झाल्याने नगरविकास विभागाच्या अधिकारांना कात्री लागण्याची शक्यता आहे. कोकणाला जागतिक दर्जाचे क्षेत्र म्हणून विकसित करण्याची शासनाची योजना असली तरी आधी त्या दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. प्रत्यक्षातली परिस्थिती मात्र विपरीत आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण गेली १२ वर्षे रखडले आहे. केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी देशात चांगले रस्ते बनविण्यासाठी प्रसिद्ध असले तरी दहा वर्षांच्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यांचे खाते हा महामार्ग पूर्ण करू शकलेले नाही. दळणवळणाची साधनेच पुरेशी उपलब्ध नसतील तर विकासाची स्वप्ने रंगविणे कितपत योग्य? किनारा महामार्ग किंवा ग्रीनफिल्ड रस्ता कोकणात उभारण्याची घोषणा झाली असली तरी तो पूर्ण कधी होणार याबाबत काहीच स्पष्टता नाही. कोकण हा मुळातच निसर्गसंपन्न परिसर. मग त्याचा विकास करणार म्हणजे नेमके काय करणार, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. काही वर्षांपूर्वी वसई-विरारच्या नियोजनासाठी ‘सिडको’ची नियुक्ती करण्यात आली होती. ‘सिडको’ने तयार केलेल्या विकास आराखड्यातून वसई-विरार परिसराचा बट्ट्याबोळच झाल्याचा आरोप वसईतील पर्यावरणवाद्यांनी केला होता. कारण त्यानंतर तिथल्या किनारपट्टी परिसरात बांधकामांना वेग आला होता. आता कोकणच्या किनारपट्टीवरही बांधकामांचे पेव फुटू नये हीच अपेक्षा. ‘परिसराचा आर्थिकदृष्ट्या विकास व स्थानिकांचे आर्थिक सक्षमीकरण होणे व त्यातून पर्यटनाचा विकास’ असे ध्येय सरकारने ठेवले आहे. आर्थिकदृष्ट्या विकास करताना किनारपट्टी परिसरात बांधकामांना मंजुरी देऊन तिथे सिमेंट काँक्रीटचे जंगल उभे राहणार नाही, अशी खबरदारी सरकारला घ्यावी लागेल. मुंबईत पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने विकासकांचे लक्ष आता बदलापूरच्या पुढे कर्जत, खोपोली तसेच अलिबागकडे गेले आहे. अलिबागच्या किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणावर बंगले उभे राहिले, पण सरकारी यंत्रणा त्या तुलनेत पायाभूत सुविधा निर्माण करू शकल्या नाहीत, ही वस्तुस्थिती बोलकी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शाहू महाराज द्वितीय उतरणार लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात!

## कोल्हापूर येथील न्यू पॅलेसवरील कार्यालियात पत्रकारांशी संवाद

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**यंदाची लोकसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांत जाहीर होऊ शकते. त्याआधीच सर्व पक्ष निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. लोकसभेला महाराष्ट्रात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना पाहायला मिळणार आहे.**

दरम्यान, युती आणि आघाडीतले पक्ष जागावाटपावर चर्चा करत असतानाच कोल्हापूरचे शाहू महाराज द्वितीय यांनी लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. शाहू महाराज कोल्हापूर मतदारसंघातून लोकसभेला उभे राहणार आहेत. शाहू महाराजांचे पुत्र आणि माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनीदेखील या वृत्ताला दुजोरा दिला आहे. संभाजीराजे म्हणाले, माझ्या वडिलांनी लोकसभेला उभे राहण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यांना या निवडणुकीत जिंकवण्यासाठी आम्ही सर्वजण १००० टक्के योगदान देऊ. महाराजांचा अनुभव कोल्हापूरला वेगळी दिशा दाखवेल यात काही शंका नाही.

संभाजीराजे छत्रपती यांनी काही वेळापूर्वी कोल्हापूर येथे प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, मी लोकसभा निवडणूक लढवणार होतो. माझं तसं ठरलं होतं. मी कोल्हापूर किंवा नाशिक मतदारसंघाचा विचार करत होतो. परंतु, माझ्या वडिलांनी निवडणूक लढवायचं ठरवलं आहे. त्यांनी इच्छा व्यक्त केल्यावर माझा निवडणूक लढवण्याचा प्रश्नच उरत नाही. माझे वडील माझ्यासाठी सर्वस्व आहेत. त्यामुळे मी माझ्या सर्व सहकाऱ्यांना तयारी करण्यास सांगितलं आहे. मी ही निवडणूक लढवली असती तर माझं शंभर टक्के योगदान दिलं असतं.



आता महाराज लढणार आहेत म्हटल्यावर महाराजांसाठी आम्ही १००० टक्के योगदान देऊ. शाहू महाराज कोल्हापूर मतदारसंघातून लोकसभेला उभे राहणार आहेत. शाहू महाराजांचे पुत्र आणि माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनीदेखील या वृत्ताला दुजोरा दिला आहे. संभाजीराजे म्हणाले, माझ्या वडिलांनी लोकसभेला उभे राहण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यांना या निवडणुकीत जिंकवण्यासाठी आम्ही सर्वजण १००० टक्के योगदान देऊ. महाराजांचा अनुभव कोल्हापूरला वेगळी दिशा दाखवेल यात काही शंका नाही.

संभाजीराजे छत्रपती यांनी काही वेळापूर्वी कोल्हापूर येथे प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, मी लोकसभा निवडणूक लढवणार होतो. माझं तसं ठरलं होतं. मी कोल्हापूर किंवा नाशिक मतदारसंघाचा विचार करत होतो. परंतु, माझ्या वडिलांनी निवडणूक लढवायचं ठरवलं आहे. त्यांनी इच्छा व्यक्त केल्यावर माझा निवडणूक लढवण्याचा प्रश्नच उरत नाही. माझे वडील माझ्यासाठी सर्वस्व आहेत. त्यामुळे मी माझ्या सर्व सहकाऱ्यांना तयारी करण्यास सांगितलं आहे. मी ही निवडणूक लढवली असती तर माझं शंभर टक्के योगदान दिलं असतं. आता महाराज लढणार आहेत म्हटल्यावर महाराजांसाठी आम्ही १००० टक्के योगदान देऊ. संभाजीराजे छत्रपतींनी यावेळी प्रश्न विचारण्यात आला की, शाहू महाराज कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार आहेत? ते मशाल (शिवसेनेचा ठाकरे गट) किंवा हाताचा पंजा (काँग्रेस) यापैकी कुठल्या चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत? कारण, या दोन पक्षांबाबत राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा ऐकायला मिळत आहेत. यावर संभाजीराजे म्हणाले, शाहू महारांजांची भूमिका मी मांडू शकत नाही. त्यांची भूमिका तेच स्पष्ट करतील. तसेच कोल्हापूरच्या जनतेलाही महाराज हवे आहेत. संभाजीराजे छत्रपतींनी यावेळी प्रश्न विचारण्यात आला की, शाहू महाराज कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार आहेत?

### हाच विचार देशभर जावा

» महाराज प्रामुख्याने महाविकास आघाडीकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. परंतु, त्यांच्या उमेदवारीबाबत मविआ नेते काय निर्णय घेणार आणि महाराजांची भूमिका काय असेल ते आपल्याला लवकरच कळेल. मविआचे नेते आणि महाराज योग्य वेळी सर्व गोष्टी स्पष्ट करतील.संभाजीराजे म्हणाले, शाहू महाराजांसाठी आम्ही संपूर्ण कोल्हापूर मतदारसंघ पिंजून काढू. कोल्हापूर हा जिल्हा छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराजांच्या विचाराने चालणारा जिल्हा आहे. हाच विचार देशभर जावा अशी महाराजांची इच्छा आहे. आम्ही त्यासाठी सर्व प्रकारची मेहनत घेऊ.

# भंडारा लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवार निश्चित!

## काँग्रेसकडून निवडणूक लढविण्यासाठी तयारी सुरू

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीचे वातावरण आता चांगलेच तापले आहे. विविध मतदारसंघात उमेदवारांच्या नावांची घोषणा होत आहे. मात्र भंडारा- गोंदिया लोकसभा मतदारसंघात कोणत्याही पक्षाने आपल्या उमेदवाराची अधिकृत घोषणा अद्यापही केली नाही.**



सोशल मीडियावर तर दररोज नवनवीन नावांचा शोध लावला जात आहे. तर दुसरीकडे इच्छुकांचा जीव मात्र टांगणीला लागला आहे.भाजपमध्ये दोन इच्छुकांमध्ये रस्सीखेच चालली असतानाच काल मुंबई येथे झालेल्या बैठकीत काँगेसने भंडारा गोंदिया मतदारसंघासाठी तीन नावे निश्चित केली असून यातील एका उमेदवाराचे नाव लवकरच जाहीर करण्यात येईल अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. यात काँग्रेसकडून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, लाखनीचे डॉ. चंद्रकांत निंबार्ते, जि.प. सदस्य मोहन पंचभाई ही तीन नावे केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात आली आहेत. त्यामुळे या तीन नावांपैकीच काँगेसचा एक उमेदवार असणार हे मात्र निश्चित. दरम्यान जयश्री बोरकर या महिला उमेदवाराच्या नावाचीही शिफारस करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

त्यामुळे काँग्रेस तरी महिलांना संधी देईल का हे ही बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे. भाजपाकडून विद्यमान खासदार सुनील मेंढे, माजी राज्यमंत्री परिणय फुके, संजय कुंभलकर, हेमंत पटले, विजय शिवणकर, ब्रम्हानंद करंजेकर, आमदार विजय रहांगडाले यांची नावे चर्चेत असली तरी खासदार सुनील मेंढे आणि परिणय फूके या दोन नावांभोवतीच सध्या चर्चेचे वर्तुळ आहे.

### कुणाचे ठरलयं अन् कुणाचे बिघडलयं

» मात्र दोन्ही जिल्ह्यात विखुरलेल्या कमळांच्या पाकळ्यांमुळे काँग्रेसचा हात बळकटीच्या उंबरठ्यावर असल्याच्या चर्चा आहेत. त्यामुळे भाजपाचा व महाविकास आघाडीचा उमेदवार नेमका कोण असणार, उमेदवार म्हणून कुणाचे ठरलयं अन् कुणाचे बिघडलयं, स्थानिकांना संधी मिळणार की अन्य उमेदवार लादला जाणार

# भारतीय तरुण रशियात अडकले!

## व्हिडीओ शेअर करत सरकारकडे मदतीचं आवाहन केलं

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नववर्षाच्या स्वागतासाठी परदेशात गेलेल्या पंजाब आणि हरयाणातील सात तरूणांसोबत धक्कादायक प्रकार घडला. त्यांनी व्हिडीओ शेअर करत भारत सरकारकडे मदतीचं आवाहन केलं आहे. रशियामध्ये फिरायला गेले असता तिथं त्यांना जबरदस्तीनं लष्करी सेवेत काम करावं लागत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच रशिया आणि युक्रेन युद्धासाठी आमचा बळजबरीनं वापर होत असल्याचा दावा त्यांनी केला.**



सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये हे तरुण एका बंद खोलीत असल्याचे दिसतात. गगनदीप सिंग (२४), लवप्रीत सिंग (२४), नारायण सिंग (२२), गुरप्रीत सिंग (२१), गुरप्रीत सिंग (२३), हर्ष कुमार (२०) आणि अभिषेक कुमार (२१) अशी या तरुणांची नावं आहेत. ते पंजाब आणि हरयाणा येथील रहिवासी आहे. त्यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळतं की, ते एका बंद खोलीत लष्करी जवानांचं जॅकेट आणि डोक्यावर टोपी परिधान केलेल्या अवस्थेत आहेत.हरयाणाच्या कर्नाल जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या २० वर्षीय हर्षने त्यांची माहिती देणारा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओच्या माध्यमातून त्यानं भारत सरकारकडं मदतीसाठी आवाहन केलं आहे. हर्षच्या म्हणण्यानुसार, नवीन वर्ष साजरं करण्यासाठी तो मित्रांसह २७ डिसेंबरला ९० दिवसांचा व्हिसा घेऊन रशियाला गेला होता. त्यांना तिथं एका एजंटने फसवलं, ज्यानं त्यांना बेलारूसला नेण्याचं आश्वासन दिलं, परंतु व्हिसाच्या आवश्यकतेबद्दल त्यांना काहीच माहिती दिली नाही. ते बेलारूसला पोहोचल्यावर एजंटनं आणखी काही पैसे मागितले. त्याला त्यांनी पैसे देखील दिले. मात्र तो पैसे घेऊन त्यांना तिथेच सोडून गेला. त्यानंतर तेथील पोलिसांनी सात जणांना पकडून रशियन लष्कराच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिलं.व्हिडीओच्या माध्यमातून हर्षने आरोप केला आहे की, त्याला काही कागदपत्रांवर सही करण्यास भाग पाडले गेले. आता त्यांना युक्रेनविरुद्धच्या युद्धात लढण्यास भाग पाडले जात आहे. हर्षला परदेशात जाऊन नोकरी करायची होती, असा खुलासा हर्षच्या कुटुंबीयांनी केला. खरं तर त्याला एजंटकडून सांगण्यात आले की, रशियातून दुसऱ्या देशात स्थलांतरित होणे सोपे होईल. तर हर्षचा सहकारी असलेल्या गुरप्रीत सिंगचा भाऊ अमृत सिंगने सांगितले की, त्यांनी स्वाक्षरी केलेली कागदपत्रे रशियन भाषेत असल्याने त्यांना काही समजले नाही. मग त्यांना बेलारूसमध्ये लष्करी सेवेत बळजबरीने तैनात करण्यात आले. त्यांना १० वर्षांचा तुरुंगवास किंवा रशियन सैन्यात सामील होण्याचा पर्याय देण्यात आला होता. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये हे तरुण एका बंद खोलीत असल्याचे दिसतात. गगनदीप सिंग (२४), लवप्रीत सिंग (२४), नारायण सिंग (२२), गुरप्रीत सिंग (२१), गुरप्रीत सिंग (२३), हर्ष कुमार (२०) आणि अभिषेक कुमार (२१) अशी या तरुणांची नावं आहेत. ते पंजाब आणि हरयाणा येथील रहिवासी आहे. त्यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळतं की, ते एका बंद खोलीत लष्करी जवानांचं जॅकेट आणि डोक्यावर टोपी परिधान केलेल्या अवस्थेत आहेत.हरयाणाच्या कर्नाल जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या २० वर्षीय हर्षने त्यांची माहिती देणारा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओच्या माध्यमातून त्यानं भारत सरकारकडं मदतीसाठी आवाहन केलं आहे. हर्षच्या म्हणण्यानुसार, नवीन वर्ष साजरं करण्यासाठी तो मित्रांसह २७ डिसेंबरला ९० दिवसांचा व्हिसा घेऊन रशियाला गेला होता. त्यांना तिथं एका एजंटने फसवलं, ज्यानं त्यांना बेलारूसला नेण्याचं आश्वासन दिलं, परंतु व्हिसाच्या आवश्यकतेबद्दल त्यांना काहीच माहिती दिली नाही. ते बेलारूसला पोहोचल्यावर एजंटनं आणखी काही पैसे मागितले. त्याला त्यांनी पैसे देखील दिले. मात्र तो पैसे घेऊन त्यांना तिथेच सोडून गेला. त्यानंतर तेथील पोलिसांनी सात जणांना पकडून रशियन लष्कराच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिलं. व्हिडीओच्या माध्यमातून हर्षने आरोप केला आहे की, त्याला काही कागदपत्रांवर सही करण्यास भाग पाडले गेले. आता त्यांना युक्रेनविरुद्धच्या युद्धात लढण्यास भाग पाडले जात आहे. हर्षला परदेशात जाऊन नोकरी करायची होती, असा खुलासा हर्षच्या कुटुंबीयांनी केला.

### हरयाणा जिल्ह्यातील रहिवासी

» खरं तर त्याला एजंटकडून सांगण्यात आले की, रशियातून दुसऱ्या देशात स्थलांतरित होणे सोपे होईल. तर हर्षचा सहकारी असलेल्या गुरप्रीत सिंगचा भाऊ अमृत सिंगने सांगितले की, त्यांनी स्वाक्षरी केलेली कागदपत्रे रशियन भाषेत असल्याने त्यांना काही समजले नाही. मग त्यांना बेलारूसमध्ये लष्करी सेवेत बळजबरीने तैनात करण्यात आले. त्यांना १० वर्षांचा तुरुंगवास किंवा रशियन सैन्यात सामील होण्याचा पर्याय देण्यात आला होता.नववर्षाच्या स्वागतासाठी परदेशात गेलेल्या पंजाब आणि हरयाणातील सात तरूणांसोबत धक्कादायक प्रकार घडला. त्यांनी व्हिडीओ शेअर करत भारत सरकारकडे मदतीचं आवाहन केलं आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये हे तरुण एका बंद खोलीत असल्याचे दिसतातयेथील रहिवासी आहे. त्यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळतं की, ते एका बंद खोलीत लष्करी जवानांचं जॅकेट आणि डोक्यावर टोपी परिधान केलेल्या अवस्थेत आहेत.हरयाणाच्या कर्नाल जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या २० वर्षीय हर्षने त्यांची माहिती देणारा व्हिडीओ शेअर केला आहे.

# नागपुरात बर्ड फ्लूचा उद्रेक; ८५०१ कोंबड्यांची कलिंग!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नागपुरात बर्ड फ्लूचा संक्रमण झाल्याचे समोर आले आहे. राज्य सरकारच्या प्रादेशिक अंडी उबवणी केंद्रामधील पोल्ट्री फार्ममध्येच बर्ड फ्लूचा उद्रेक होऊन गेल्या काही दिवसात रोज शेकडो कोंबड्यांचा मृत्यू होत होता.**

त्यानंतर पशु संवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी एवढ्या मोठ्या संख्येने कोंबड्यांचा मृत्यू का होत आहे? हे तपासण्यासाठी पुण्याच्या आणि नंतर भोपाळ मधील उच्च सुरक्षा प्रयोगशाळेत तपासणीसाठी नमुने पाठवण्यात आले होते. त्यानंतर चार मार्च रोजी आलेल्या अहवालात कोंबड्यांना बर्ड फ्लूची म्हणजेच एवियन इन्फ्लुएंजाची लागण झाल्याचे रिपोर्टमध्ये स्पष्ट झाले आहे. बर्ल्ड फ्लूची संक्रमण झाल्याचे समोर येताच नियमानुसार संबंधित पोल्ट्री फार्मच्या एक किलोमीटरचा परिसर बाधित क्षेत्र तर दहा किलोमीटर पर्यंतचा परिसर निगराणी क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलं आहे. तसंच, रिपोर्ट आल्यानंतर पाच मार्चच्या रात्री संबंधित पोल्ट्री फार्म मधील ८५०१ कोंबड्यांची कलिंग म्हणजेच कोंबड्या मारण्याची प्रक्रिया करण्यात आली. सोबतच फॉर्म मधील १६हजार पेक्षा जास्त अंडीही नष्ट करण्यात आली आहेत. नागपूरच्या जिल्हा परिषद संवर्धन उपायुक्त मंजुषा पुंडलिक यांनी प्रादेशिक अंडी उबवणी केंद्रामधील पोल्ट्री फार्ममध्ये बर्ड फ्लूचा उद्रेक झाल्याचे मान्य केले आहे. तसेच नागरिकांनी घाबरून जाण्याचं कारण नसून शासनाने संबंधित पोल्ट्री फार्ममध्ये बर्ड फ्लूचा उद्रेक झाल्यानंतर पाळावयाच्या सर्व नियमांचे पालन करत कोंबड्या आणि अंडी नष्ट करण्याची प्रक्रिया पूर्ण केल्याचा दावा केला आहे.

### बर्ड फ्लुचे मुख्य कारण हे पक्षीच असतात.

» बर्ड फ्लू हा आजार एवियन इन्फ्लुएंजा व्हायरस ५१ मुळं होतो. साधारणतः हा व्हायरल कोंबड्या, टर्की, मोर आणि बदक या पक्ष्यांमुळं पसरतो. हा व्हायरस फार धोकादायक असून त्यामुळं पक्ष्यांसोबत माणसांचाही मृत्यू होण्याची भिती असते. बर्ड फ्लुचे मुख्य कारण हे पक्षीच असतात. माणसांमध्ये हा आजार कोंबड्यांमुळं किंवा पक्षांच्या बर्ड फ्लू झालेल्या पक्ष्यांच्या सानिध्यात आल्यामुळं होतं.



### बर्ड फ्लूपासून करा बचाव

बर्ड फ्लूची लक्षण ही तापासारखीच असतात. ताप, छातीत कफ होणे, नाक वाहणे, डोकेदुखी, स्नायूंमध्ये वेदना, उलट्या होणं, डोळ्यांच्या समस्या, अशी लक्षणे दिसतात. झालेल्या पक्ष्यांच्या सानिध्यात आल्यामुळं होतं. बर्ड फ्लू झालेल्या पक्षापासून लांब राहा. तसंच, परिसरात बर्ड फ्लूची साथ आली असेल तर काही दिवस चिकन खाणे टाळा.

# मलायकाबरोबर थिरकणारा मराठी तरुण

बॉलीवूडमधली अभिनेत्री मलायका अरोरा अभिनयाबरोबरच उत्तम डान्सरही आहे. 'चल छय्या छय्या', 'मुन्नी बदनाम' अश्या गाण्यांमुळे तिला प्रसिद्धी मिळाली. 'नच बलिये', 'झलक दिखलाजा' यांसारख्या डान्स शोजचे मलायकाने परीक्षणही केले आहे. सध्या मलायका वेगळ्याच कारणाने चर्चेत आहे.मलायकाचा एक डान्स व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. 'आंटीजी आंटीजी' या गाण्यावर मलायका एका मुलाबरोबर थिरकताना दिसत आहेत. उत्तम डान्स मूव्हज करत दोघंही डान्सचा आनंद घेताना पाहायला मिळतायत. पण, मलायकाबरोबर हा मुलगा नक्की कोण आहे असा प्रश्न तुम्हाला पडला असेल, तर जाणून घेऊया महाराष्ट्राशी नातं असलेल्या या मुलाबाबत. प्रतीक उतेकर हा मराठी आणि हिंदी इंडस्ट्रीमधील प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक आहे. 'डान्स महाराष्ट्र डान्स' या मराठी रिॲलिटी शोमध्ये प्रतीक उतेकरने सहभाग घेतला होता. उपविजेतेपद मिळवत प्रतीकने प्रेक्षकांचं मन जिंकलं. यानंतर त्याने 'डान्स दिवाने', 'झलक दिखलाजा', 'नच बलिये' अशा अनेक शोंसाठी नृत्यदिग्दर्शन केले. माधुरी दीक्षित, प्रियांका चोप्रापासून ते सलमान खानपर्यंत अनेक कलाकारांसाठी प्रतीकने नृत्यदिग्दर्शन केलं आहे. आज तो नामांकित सेलिब्रिटी कोरियोग्राफर आहे.'फिल्मीग्यान' या अकाउंटवरील मलायका आणि प्रतीकच्या व्हायरल डान्स व्हिडीओवर नेटकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. "ही नोरासारखी नाचते आहे", असं एक जण कमेंट करत म्हणाला. तर "आंटी बस करा आता", अशी कमेंट दुसऱ्या युजरने केली आहे.दरम्यान, मलायका 'झलक दिखलाजा' या शोमध्ये परीक्षक म्हणून कार्यरत होती. नुकताच या शोचा ग्रँड फिनाले पार पडला. मलायकाच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सांगायचं झाल्यास, १९९८ साली मलायका अरोरा आणि अरबाज खान लग्नबंधनात अडकले होते. १९ वर्षांच्या संसारानंतर दोघांनी घटस्फोट घेतला. त्यानंतर बरेच वर्ष मलायका अर्जुन कपूरला डेट करत आहे.बॉलीवूडमधली अभिनेत्री मलायका अरोरा अभिनयाबरोबरच उत्तम डान्सरही आहे. 'चल छय्या छय्या', 'मुन्नी बदनाम' अश्या गाण्यांमुळे तिला प्रसिद्धी मिळाली. 'नच बलिये', 'झलक दिखलाजा' यांसारख्या डान्स शोजचे मलायकाने परीक्षणही केले आहे. सध्या मलायका वेगळ्याच कारणाने चर्चेत आहे.मलायकाचा एक डान्स व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. 'आंटीजी आंटीजी' या गाण्यावर मलायका एका मुलाबरोबर थिरकताना दिसत आहेत.

# जान्हवी कपूर तिरुपतीच्या दर्शनाला



अभिनेत्री जान्हवी कपूरने आज आपला २७ वा वाढदिवस तिरुपती मंदिरात दर्शन घेऊन साजरा केला. बॉयफ्रेंड शिखर पहारिया आणि सोशल मीडिया स्टार असलेला तिचा जवळचा मित्र ओरी यांच्यासह जान्हवी तिरुपतीच्या दर्शनासाठी गेली होती. जान्हवी कपूरने मंदिरात दर्शन घेताना खास दाक्षिणात्य पद्धतीने साडी नेसली होती. पारंपरिक दाक्षिणात्य पेहरावात अभिनेत्री खूपच सुंदर दिसत होती. याशिवाय शिखर आणि ओरीदेखील पारंपरिक पोशाख करून मंदिरात दर्शन घेण्यासाठी गेले होते. या तिघांचा मंदिर परिसरातील व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.जान्हवी आणि शिखर अनंत अंबानींच्या प्री-वेडिंग सेलिब्रेशनमध्येही एकत्र सहभागी झाले होते.

# रणदीप हुड्डाने इतिहासाचा विपर्यास

रणदीप हुड्डा दिग्दर्शित वीर सावरकर हा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच वादात अडकला आहे. या सिनेमाचा ट्रेलर मंगळवारी आला. या ट्रेलरमध्ये सुभाषचंद्र बोस आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यातला एक संवाद दाखवण्यात आला आहे. त्या संवादावरुन सुभाषचंद्र बोस यांचे पणतू चंद्रकुमार बोस यांनी रणदीप हुड्डाला झापलं आहे.चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये वीर सावरकरांची स्वातंत्र्य चळवळ, अंदमानातील काळ्या पाण्याची शिक्षा, हिंदू महासभेचे कार्य या सगळ्याचा उल्लेख आहे. नेताजी सुभाषचंद्र यांच्यासह आणि महात्मा गांधींसह संवाद आहेत. पंडित नेहरु, मादाम कामा, भगतसिंग, मदनलाल धिंग्रा यांची झलक आहे. वीर सावरकर यांच्या पत्नीची भूमिका अंकिता लोखंडेने साकारली आहे. अनेकांनी चित्रपटाच्या मांडणीवर आक्षेप घेण्यास सुरुवात केली आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे पणतू चंद्रकुमार बोस यांनीही रणदीप हुड्डाला सुनावले आहे.'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटाच्या ट्रेलरमधील एका दृश्यात स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यातील संवाद दाखवला आहे. वीर सावरकर यांच्या भूमिकेत रणदीप हुड्डा आहे. वीर सावरकर नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सांगतात, जर्मनी आणि जपानच्या आधुनिक हत्यारांसह इंग्रजांवर हल्ला करा. नेमका याच संवादावर सुभाषचंद्र बोस यांचे पणतू चंद्रकुमार बोस यांनी रणदीप हुड्डाला झापलं आहे. रणदीप हुड्डा वीर सावरकरांवर चित्रपट करत असेल .



# चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान सारा अली खान जखमी

बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान नेहमीच चर्चेत असते. आपल्या अभिनयाच्या जोरावर साराने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. लवकरच साराचे दोन नवीन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. सध्या सारा या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. एका प्रमोशन कार्यक्रमादरम्यान सारा अली खानबरोबर अपघात घडला आहे. अभिनेत्रीने सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करत ही माहिती दिली. सोशल मीडियावर सारा मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे व्हिडीओ शेअर करत ती चाहत्यांना अपडेट देत असते. सारा सध्या तिचे अगामी 'मर्डर मुबारक' व 'ए वतन मेरे वतन' चित्रपटांचे जोरदार प्रमोशन करताना दिसत आहे. 'ए वतन मेरे वतन' चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान सारा जखमी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार तिचे पोट भाजले आहे.साराने आपल्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये सारा तिच्या खास शैलीत प्रेक्षकांना शुभेच्छा देताना दिसत आहे. या व्हिडीओत साराच्या पोटाला जखम झाल्याचे दिसून येत आहे. या जखमेवर साराने मलमही लावल्याचे दिसून येत आहे. या अपघाताबाबत माहिती देताना सारा म्हणाली, मी एकाच वेळी दोन चित्रपटांचे प्रमोशन करत आहे आणि या प्रमोशन कार्यक्रमादरम्यान माझ्याबरोबर हा अपघात झाला. मात्र, हा अपघात नेमका कसा झाला याबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही.साराच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास, लवकरच तिचे दोन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. येत्या १५ मार्चला तिचा 'मर्डर मुबारक' चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर पंकज त्रिपाठी, करिश्मा कपूर, विजय वर्मा, टिसका चोप्रा, डिंपल कपाडिया, संजय कपूर आणि सोहेल नय्यर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तसेच 'ए वतन मेरे वतन' चित्रपटातही ती झळकणार आहे.बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान नेहमीच चर्चेत असते. आपल्या अभिनयाच्या जोरावर साराने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. लवकरच साराचे दोन नवीन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. सध्या सारा या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. एका प्रमोशन कार्यक्रमादरम्यान सारा अली खानबरोबर अपघात घडला आहे.

# इंग्लंडची प्लेईंग 11 जाहीर, मार्क वूड परतला!

## टीम इंडियाने मालिकेत 3-1 अशी अभेद्य आघाडी घेतली

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**इंग्लंडने भारताविरुद्धच्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीसाठी प्लेइंग इलेव्हन जाहीर केली आहे. इंग्लिश संघ व्यवस्थापनाने प्लेइंग इलेव्हनमध्ये फक्त एक बदल केला आहे. वेगवान गोलंदाज ऑली रॉबिन्सनच्या जागी वेगवान गोलंदाज मार्क वुडचे पुनरागमन झाले आहे. चौथ्या कसोटीत त्याला विश्रांती देण्यात आली होती आणि त्याच्या जागी रॉबिन्सन खेळला होता. भारताने ही मालिका आधीच जिंकली आहे. टीम इंडियाने मालिकेत ३-१ अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. शेवटची कसोटी जिंकून टीम इंडियाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ सायकलमध्ये आपले स्थान आणखी मजबूत करायचे आहे. भारतीय संघ सध्या डब्ल्यूटीसीमध्ये अव्वल स्थानावर आहे.**



इंग्लंडच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये दोन फिरकीपटू आणि दोन वेगवान गोलंदाज आहेत. रांची कसोटीत डावात पाच बळी घेणारा शोएब बशीर आपली जागा वाचवण्यात यशस्वी ठरला. त्याचवेळी टॉम हार्टले त्याला फिरकीत साथ देईल. वुडशिवाय अँडरसन वेगवान गोलंदाजी करताना दिसणार आहे. या कसोटीत बेन स्टोक्स गोलंदाजी करतो की नाही हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. त्याने हळूहळू गोलंदाजीचा सराव सुरू केला आहे. धरमशाला येथील खेळपट्टी साधारणपणे वेगवान गोलंदाजांना अनुकूल असते. अशा स्थितीत स्टोक्सही गोलंदाजी करताना दिसू शकतो. त्याच वेळी, रूट अतिरिक्त गोलंदाजाची भूमिका बजावेल. रेहान अहमद लंडनला परतला असून तो मालिकेतून बाहेर पडला आहे.

४१ वर्षीय जेम्स अँडरसन सलग चौथी कसोटी खेळताना दिसणार आहे. आतापर्यंत इंग्लंडने तीन वेगवान गोलंदाजांना आजमावले असून अँडरसन त्यापैकी सर्वाधिक यशस्वी ठरला आहे. त्याच्या नावावर आठ विकेट्स आहेत, तर वुडला फक्त चार विकेट घेता आल्या आहेत. हार्टले हा या मालिकेतील आतापर्यंतचा सर्वात यशस्वी गोलंदाज आहे. त्याच्या नावावर २० विकेट आहेत. तर, बशीरने १२ विकेट्स घेतल्या आहेत. हार्टलीनंतर बुमराह, जडेजा आणि अश्विनचा क्रमांक लागतो. तिघांनीही १७-१७ विकेट्स घेतल्या आहेत.

फलंदाजांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. संघ व्यवस्थापनाने फॉर्मात नसलेल्या जॉनी बेअरस्टोवर पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. चांगली सुरुवात करून देण्याची जबाबदारी झॅक क्रॉऊली आणि बेन डकेट यांच्यावर असेल. त्याचबरोबर मधल्या फळीची जबाबदारी ऑली पोप, जो रूट, बेन स्टोक्स आणि बेअरस्टो यांच्यावर असेल. इंग्लंडने भारताविरुद्धच्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीसाठी प्लेइंग इलेव्हन जाहीर केली आहे. इंग्लिश संघ व्यवस्थापनाने प्लेइंग इलेव्हनमध्ये फक्त एक बदल केला आहे. वेगवान गोलंदाज ऑली रॉबिन्सनच्या जागी वेगवान गोलंदाज मार्क वुडचे पुनरागमन झाले आहे. चौथ्या कसोटीत त्याला विश्रांती देण्यात आली होती आणि त्याच्या जागी रॉबिन्सन खेळला होता. भारताने ही मालिका आधीच जिंकली आहे.

### मार्क वुडचे पुनरागमन

पाचव्या कसोटीसाठी इंग्लंडची प्लेइंग इलेव्हन: झॅक क्रॉऊली, बेन डकेट, ऑली पोप, जो रूट, जॉनी बेअरस्टो, बेन स्टोक्स (कर्णधार), बेन फोक्स (यष्टीरक्षक), शोएब बशीर, टॉम हार्टली, मार्क वुड, जेम्स अँडरसन. गुरुवारी नाणेफेकीच्या वेळी भारतीय संघ आपला प्लेइंग इलेव्हन घोषित करेल. जसप्रीत बुमराहच्या पुनरागमनामुळे टीम इंडिया मजबूत झाली आहे. अशा परिस्थितीत सिराज आणि आकाश दीप यांच्यामध्ये दुसरा वेगवान गोलंदाज कोण असेल हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. त्याचवेळी रजत पाटीदारच्या जागी देवदत्त पडिक्कल यांना संधी मिळू शकते.इंग्लंडने भारताविरुद्धच्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीसाठी प्लेइंग इलेव्हन जाहीर केली आहे. इंग्लिश संघ व्यवस्थापनाने प्लेइंग इलेव्हनमध्ये फक्त एक बदल केला आहे. वेगवान गोलंदाज ऑली रॉबिन्सनच्या जागी वेगवान गोलंदाज मार्क वुडचे पुनरागमन झाले आहे. चौथ्या कसोटीत त्याला विश्रांती देण्यात आली होती आणि त्याच्या जागी रॉबिन्सन खेळला होता. भारताने ही मालिका आधीच जिंकली आहे. टीम इंडियाने मालिकेत ३-१ अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. शेवटची कसोटी जिंकून टीम इंडियाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५ सायकलमध्ये आपले स्थान आणखी मजबूत करायचे आहे.

# मुंबई इंडियन्सच्या शबनीम इस्माईलने रचला इतिहास

## महिला क्रिकेटमध्ये ताशी 130 किलोमीटरचा टप्पा ओलांडण्याची ही पहिलीच वेळ

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई इंडियन्सची वेगवान गोलंदाज शबनीम इस्माईलने मंगळवारी महिला प्रीमियर लीग २०२४ मध्ये दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात इतिहास रचला. तिने महिला क्रिकेट इतिहासातील सर्वात वेगवान चेंडू टाकला. महिला क्रिकेटमध्ये स्पीड मीटरवर ताशी १३० किलोमीटरचा टप्पा ओलांडण्याची ही पहिलीच वेळ आहे.**




या सामन्यात शबनिमने दिल्लीच्या डावातील तिसऱ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर हा विक्रम केला. दक्षिण आफ्रिकेकडून आंतरराष्ट्रीय सामने खेळणाऱ्या शबनिमने दिल्लीची कर्णधार मेग लॅनिंगकडे फुल लेन्थ चेंडू टाकला. तो लॅनिंगच्या पॅडला लागला.मुंबई संघाने एलबीडब्ल्यूचे अपील केली, पण पंचांनी ती फेटाळली. त्यामुळे या चेंडूवर विकेट मिळाली नाही, परंतु लवकरच स्टेडियममधील मोठ्या स्क्रीनवर चेंडूचा वेग १३२.१ किलोमीटर प्रतितास (८२.०८ ) असल्याचे नोंदवले गेले. यानंतर संपूर्ण स्टेडियमने शबनिमसाठी टाळ्या वाजवल्या. जेव्हा तिला विचारले गेले की आतापर्यंतचा सर्वात वेगवान चेंडू टाकून इतिहास रचला हे माहित आहे का? डाव संपल्यानंतर शबनिम म्हणाली, 'जेव्हा मी गोलंदाजी करत असते तेव्हा मी पडद्याकडे पाहत नाही.'शबनिमने महिला क्रिकेटमधील सर्वात वेगवान चेंडूचा स्वतःचा विक्रम मोडला.ताशी १३२.१ किमीचा वेग गाठण्यापूर्वी शबनीमने १२८ किमी प्रतितास या विक्रमी वेगाने चेंडू टाकला होता. तिने २०१६ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध १२८ किलोमीटर प्रतितास (७९.५४ ) आणि २०२२ मधील महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत दोनदा १२७ किलोमीटर प्रतितास वेगाने गोलंदाजी केली होती.

### रॉड्रिग्जने 69 धावांची नाबाद खेळी

इस्माईलने १६ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत दक्षिण आफ्रिकेसाठी १२७ वनडे, ११३ टी-२० आणि एक कसोटी सामना खेळला आहे.शबनीम इस्माईलने हा विक्रम केला, पण दिल्लीविरुद्धची तिची कामगिरी काही खास नव्हती. तिने खूप धावा खर्च केल्या. शबनिमने पहिल्या दोन षटकात १४ धावा दिल्या. शफाली वर्माने तिच्या तिसऱ्या षटकात दोन मोठे षटकार ठोकले. मात्र, नंतर शबनिमने शेफालीला नक्कीच बाद केले. शफालीला २८ धावा करता आल्या. शबनिमने चार षटकात ४६ धावा दिल्या आणि एक विकेट घेतली. दिल्लीने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ गडी गमावून १९२ धावा केल्या होत्या. कर्णधार लॅनिंगने ५३ धावा, जेमिमाह रॉड्रिग्जने ६९ धावांची नाबाद खेळी केली.